सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित
श्रीमती.मणिबेन.एम.पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालय, माटुंगा

मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य



वर्ष १, अंक १ मे २०२३

SEVA MANDAL EDUCATION SOCIETY'S

SMT. MANIBEN M.P. SHAH WOMEN'S COLLEGE OF ARTS & COMMERCE (AUTONOMOUS)

NAAC RE-ACCREDITED 'B++' GRADE WITH CGPA 2.88/4

UGC Honor : College with Potential for Excellence



## श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय हे एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्न महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय

महाराष्ट्रातील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाशी संलग्न म्हणून इ.स.१९५७ मध्ये केवळ ७ विद्यार्थिनीसह माटुंगा सेवा मंडळाचे महिला महाविद्यालय गुजराती माध्यमातून सुरु झाले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी ही शैक्षणिक संस्था (SMES) १९७१ मध्ये स्थापन झाली. त्यानंतर हे श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय ह्या नावाने महाराष्ट्रातील पहिले महिला महाविद्यालय म्हणून ओळखले जाऊ लागले.

श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालयात १९८४ साली पदवी अभ्यासक्रमात कला विद्याशाखेत समाजशास्त्र, मानसशास्त्र हे विषय इंग्रजी माध्यमातून तर हिंदी विभाग आणि आंतरविद्याशाखेतील गृह-अर्थशास्त्र कला विद्याशाखा आणि वाणिज्य विद्याशाखा सुरु झाल्या. १९९१ साली मराठी माध्यमातून मराठी भाषा व समाजशास्त्र हे विषय शिकविण्यास सुरुवात झाली. १९९४ रोजी महिला विद्यापीठातील पहिला अभ्यासक्रम संगणक अनुप्रयोग, कार्यालय व्यवस्थापन, जाहिरात आणि विक्री प्रोत्साहन मध्ये यूजीसी (UGC) व्यावसायिक अभ्यासक्रम,२००२ रोजी एनडीटी महिला विद्यापीठांतर्गत प्रथम व्यवस्थापन अध्ययनांमध्ये सेल्फ-फायनान्सिंग ग्रॅज्युएट प्रोग्रॅम आणि कमलाबेन गंभीरचंद शाह मॅनेजमेंट स्टडीज (BMS) विभाग सुरु झाले.

२००४ साली मानसशास्त्र (MA), वाणिज्य (M.com) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम केंद्र तर २०१० रोजी हिंदी (MA) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम केंद्र सुरु झाले. २००६ रोजी श्रीमती कमलाबेन गंभीरचंद शाह मास मीडिया (BAMM) पदवी अभ्यासक्रम सुरु करणारे हे पहिले महाविद्यालय आहे.

२०१३ साली नॅक मूल्यांकन दुसऱ्या चक्रात महाविद्यालयास 3.61/4 (A Grade) प्राप्त झाली. २०१४ रोजी अकाउंट्स, फायनान्स आणि इन्शुरन्ससह बीकॉम - सेल्फ-फायनान्सिंग(BAFI) सुरु करण्यात आले. २०१७ ला इंग्रजी माध्यमातून अर्थशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु झाला.

२०१९ रोजी श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय हे प्रथम स्वायत्त महिला महाविद्यालय म्हणून जाहीर झाले. महिलांना दर्जेदार शिक्षणाद्वारे त्यांचे सक्षमीकरण करणे. स्वावलंबी,जबाबदार गृहिणी,व्यावसायिक आणि सक्षम नागरिक बनविणे ही दृष्टी बाळगूनच अभ्यासक्रमाची निवड करून १९५७ पासून जो अविरत शैक्षणिक प्रवास सुरु झाला तो आजतागायत. महिला शिक्षण क्षेत्रात सेवा मंडळ ऐज्युकेशन सोसायटी ही शैक्षणिक संस्था नेहमीच अग्रेसर राहिली आहे.

# संपादकीय

आपले महाविद्यालय सेवा मंडळ सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय हे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरशी महिला विद्यापीठाशी संलग्न असे पहिले महाविद्यालय आहे. आपल्या महाविद्यालयास UGC STATUS : College With Potential For Excellence हा दर्जा प्राप्त झाला आहे. 'महर्षी कर्वे उत्कृष्ट महाविद्यालय २०१७-१८' ह्या पुरस्काराने महाविद्यालयास गौरवांकित करण्यात आले. 'शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना सक्षम, आत्मनिर्भर आणि जबाबदार नागरिक बनविणे हे महाविद्यालयाचे ब्रीद वाक्यच आहे. गेली ६५ वर्षे सातत्याने शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत राहणे हे महाविद्यालयाचे मोठे योगदानच आहे.

आपल्या महाविद्यालयाचे ध्येय पूर्णत्वास नेण्याकरिता मराठी विभाग सातत्याने प्रयत्नशील असलेला दिसतो. मराठी विभागात साहित्य क्षेत्राशी संबंधित अनेक कार्यक्रमांचे, कार्यशाळेंचे आयोजन केले जाते. मराठी विभागात 'महिला विद्यापीठाचा स्थापना दिन ते मराठी भाषा गौरव दिना' पर्यंतचे सारे शासकीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वाचनाची आवड निर्माण होण्याकरिता 'वाचन प्रेरणा दिन','वाचन संस्कृती'असे उपक्रम राबविले जातात. तसेच महिला सक्षमीकरण हे महाविद्यालयाचे ध्येय साध्य करण्याकरिता 'शारदोत्सव व्याख्यानमाले'चे आयोजन देखील केले जाते. 'पत्रकारिता प्रशिक्षण वर्ग' आणि 'संस्कृत संभाषण वर्ग' मराठी विभाग सातत्याने चालवित आहेत. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थिनींनी राष्ट्रीय व राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये घवघवीत यश मिळवून मराठी विभागाचे आणि महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. आपल्या महाविद्यालयात आपण मातृभाषेतून शिक्षण प्रधान करतो आहोत ह्याचाच खूप अभिमान वाटतो.

आता मराठी विभाग विद्यार्थीनींच्या सृजनात्मक लेखनास अधिक वाव मिळावा ह्याकरिता 'पालवी....नव चैतन्य' हे ई-नियतकालिक प्रकाशित करीत आहेत. ह्या प्रकाशनाच्या कामात मार्गदर्शन केल्याबद्दल श्रीमती वीणा निमकर ह्यांचे विशेष आभार. अशा ह्या स्तुत्य उपक्रमाकरिता मराठी विभागाचे खूप खूप अभिनंदन करते आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा..!



**डॉ. अर्चना पत्की**
**प्रभारी प्राचार्य**

मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य

### संपादकीय मंडळ

डॉ. अर्चना पत्की

डॉ. रश्मी शेटये तुपे

प्रा. वसंत पानसेर

कु. माधवी पवार

कु. ईश्वरी भोगले

कु. मुद्रा चव्हाण

कु. पूर्णिमा खैरे

कु. आरती अडांगळे


# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | पुस्तक – विजया फडतरे | पृष्ठ क्रमांक १ |
| २ | महासागराची महानता – माधवी पवार | पृष्ठ क्रमांक २ |
| ३ | शेतकऱ्याचे हाल – आकांक्षा भोसले | पृष्ठ क्रमांक ३ |
| ४ | चौकटी बाहेरील 'ती' – दीक्षा कपुरे | पृष्ठ क्रमांक ४ |
| ५ | घागर घुमू दे घुमू दे – सृष्टी त्रिंबककर | पृष्ठ क्रमांक ५ |
| ६ | स्वच्छ भारत ! श्रेष्ठ भारत ! – आरती अडांगळे | पृष्ठ क्रमांक ७ |
| ७ | खरा मित्र – ईश्वरी भोगल | पृष्ठ क्रमांक १० |
| ८ | सर्वांत मोठा हुंडा – कुमुद देसाई | पृष्ठ क्रमांक ११ |
| ९ | मी माझी सांगाती – समृद्धी काकडे | पृष्ठ क्रमांक १२ |
| १० | रात्र मला काय देते ? – रितुजा यादव | पृष्ठ क्रमांक १३ |
| ११ | प्रवास बाईपणाचा – आनंदिता | पृष्ठ क्रमांक १४ |
| १२ | गर्जा महाराष्ट्र माझा – माधवी पवार | पृष्ठ क्रमांक १५ |
| १३ | विभागीय उपक्रम – डॉ.रश्मी शेटये तुपे | पृष्ठ क्रमांक १७ |

# पुस्तक

कपाटातून डोकावून पुस्तक म्हणे मला
कित्येक महिने झाले गं वाचलेच नाही तू मला ?
मोबाईल शिवाय आता करमत नाही तुला
पुस्तक होते सोबतीला तू एकटी असताना
मोबाईल आल्यापासून विसरलीस का या मित्राला ?

पूर्वी तू तर मला रोज रोज वाचायचीस
'पुस्तक माझे मित्र' असे नेहमी म्हणायचीस
प्रत्येक संध्याकाळ घालवायचीस पुस्तक वाचण्यात
पण आता.....
दिवस घालवतेस Good Morning ते Good
Night टाईप करण्यात



आता जुना झालो न् म्हणून वाचत नाही मला
पण माझ्याशिवाय विकास नाही तुझा
मी आहे त्या जुन्या नात्यासारखा
नजर पडताच ताज्या होतील आठवणी जुन्या
प्रत्येक पानांवर ओळीवर आहे रंगीबेरंगी खुणा

शब्दांच्या दुनियेत विसरून जायचीस स्वतःला
उशीखाली घेऊन झोपायचीस मला
कथा-कादंब-यामुळे खरे जीवन कळाले तुला
पण या मोबाईलसाठी तू दूर केले मला

पूर्वी तूझी नजर थांबायची प्रत्येक पानांवर
पण आता बोट फिरत आहेत मोबाईल स्क्रिनवर
वाचण्यासाठी वेळ मिळाला तर पुन्हा मला वाच
पडलो आहे कपाटात, मैत्री सांभाळत
तुझ्याकडे एकटक पाहत
पुन्हा मला वाचशील याच आशेत !

**विजया फडतरे**
तृतीय वर्ष
मराठी विभाग

# महासागराची महानता



महासागर असे महाशक्तीचे प्रमाण
सागरात प्रतिबिंब पाहते आसमान

डोंगरकन्या भेटीस तुझ्या आतुर
मिलनाची कथा प्रसिद्ध सर्वदूर

लाटांवर लाटा किनाऱ्यास धडकती
अधिरपणे धरणीला अलिंगन देती

कोळी बांधवांना तुझा मोठा आधार
जाळ्यात अडकते मासळी बेसुमार

लक्षावधी जलचर उदरात वसती
मोती,माणिक किती रत्ने गवसती!

घाण पचविती साऱ्या जगाची
थोरवी काय वर्णावी शुभ्र मिठाची

मंथनातील हलाहल शिवाने पचवले
नीडर स्वातंत्र्यवीराने इंग्रजांस नाचवले

वरून वरून दिसतो शुभ्र फेसाळ
गर्भात दडलाय वावटळीचा जाळ

पेलवतो लीलया गलबतांचे धूड
भरती ओहोटी भन्नाट तुझे मूड

सूर्यकिरणांना प्राशूनी तृप्त होतो
शीतलता चंद्राची प्रेमाने स्वीकारतो

सर्वाथाने महासागर आहे महान
जलचक्र भागवी जगाची तहान

कल्पवृक्ष जसा जगती मिरवतो
कल्पसागर तसा इच्छा पुरवतो

अथांग हा महासागर जेव्हा आटेल
अखंड धरती मृत्यूपंथ तेव्हा गाठेल

**माधवी पवार**
तृतीय वर्ष
मराठी विभाग

# शेतकऱ्याचे हाल

विराट सतरा करोडात गेला
धोनी पंधरा करोडात गेला
जगाचा पोशिंदा मात्र
झाडावर लटकून मेला ||

अरे एखादी मॅच तुम्ही
वावरात घेऊन पहा
शेतकऱ्याची जिंदगी
एकतरी दिवस जगून पहा ||

खेळांडूसारखे करोड नको
फक्त पिकमालाला भाव द्या
कृषीरत्न कृषीभूषण नको
फक्त शेतकऱ्याला मान द्या ||

भारत कृषीप्रधान की क्रिकेटप्रधान
हाच मोठा प्रश्न पडतो
शेतकरी जगला काय मेला काय
सांगा कुणाला फरक पडतो ||

**आकांक्षा भोसले**
माजी विद्यार्थीनी
मराठी विभाग



## चौकटी बाहेरची ती.....

चौकटी बाहेरची ती....
रांधा वाढा उष्टी काढा,
रांधा वाढा उष्टी काढा यांत गुंतलेली ती
रांधा वाढा उष्टी काढा यांत गुंतलेली ती...
चूल आणि मूल यात रमलेली ती....
चूल आणि मूल यात रमलेली ती
धूराच्या चार भिंतीत आपल सुख मानणारी,
जाणीव झाली तिला स्वतःच्या अस्तित्वाची...

स्वतःच अस्तित्व बनविण्यासाठी ती चौकटी बाहेर पडली....
स्वतः च अस्तित्व बनविण्यासाठी ती चौकटी बाहेर पडली....
आणि प्रगतीच्या वाटेवर ती चालायला लागली
चौकटीच्या आत राहणारी ती

चौकटीच्या आत राहणारी ती....
वैमानिक होऊन उंच आकाशात भरारी घेऊ लागली
अहो...आकाशातच काय,
ती तर कल्पना चावला होऊन अंतराळातही पोहचली.
नाजूक,अबला,दुर्बल म्हणून हिणाविले जिला....
नाजूक,अबला, दुर्बल म्हणून हिणाविले जिला...
ती मेरी कॉम होऊन सगळ्यांना पंच दिला

चौकटीच्या आत मुलांबरोबर खेळवणारी ती
चौकटीच्या आत मुलांबरोबर खेळणारी ती सायना नेहवाल बनली.
मुलांच्या मागे धावणारी ती पी.टी उषा बनली
जिला फक्त घराच्या चार भिंती सांभाळाण्याच्या दृष्टीकोनातून बघायचा समाज
जिला फक्त घराच्या चार भिंती सांभाळण्याच्या दृष्टीकोनातून बघायचा समाज
तिने इंदिरा गांधी, प्रतिभा ताई पाटील होऊन देश सांभाळला.
अशी अनेक उदाहरणे चौकटी बाहेरच्या 'ती' ची
एक ना अनेक उदाहरणे चौकटी बाहेरच्या 'ती'ची...
आता नाही ती अबला, आता नाही ती दुर्बळ..
आता खंबीरपणे उभी आहे ती चौकटी बाहेर....चौकटी बाहेर....

# चौकटी बाहेरची ती....

**दीक्षा राहुल कपुरे**
द्वितीय वर्ष
समाजशास्त्र विभाग

# घागर घुमू दे घुमू दे, मुलींचं पाऊल वाजू दे...



श्रावणातल्या मंगळागौरीतील पारंपारिक सासर-माहेर, घर-आंगण विषयावरील गाण्यां ऐवजी यावर्षी 'मुली वाचवा' या विषयावरील गाणी घरोघरी म्हणण्याचा चंग बांधला. ज्या भारतीय संस्कृतीत आईचे स्थान अनन्यसाधारण आहे, त्याच देशात हजारो मुलींचा जन्मापूर्वीच गळा घोटला जातो. एकीकडे स्त्रीची महती गायची, तिच्या आरत्या म्हणायच्या आणि दुसरीकडे स्त्रीस्वातंत्र्याचा गळा घोटायचा, हे आपल्या देशातच घडू शकतो. स्त्रीला आपला पती निवडण्याचा अधिकार नाही, आपल्या इच्छेनुसार गर्भधारणेचा हक्क नाही, बालविवाहापासून सती प्रथेसारख्या. अनेक क्रूर प्रथांना शतकानुशतके स्त्रियांना सामोरे जावे लागत होते. हे कमी ठरावे म्हणून की काय, मातेच्या गर्भातील स्त्रीअंकुर जन्मापूर्वीच खुडण्याचे काम आधुनिक काळातील कंसरूपी डॉक्टर पैशाच्या लालसेपोटी करताना दिसतात. स्त्रीकडे अजूनही भोगवस्तू किंवा मुलांना जन्म देणारी म्हणूनच पाहिले जाते. भारतीय मानसिकतेचा हा दोष आहे का ? रुढी, परंपरांना बळी पडण्याचे काम कायम स्त्रियांनाच करावे लागते, समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे देखील स्त्रियांची परिस्थिती काही प्रमाणात सुधारत गेली. उदा. राजाराम मोहन राय यांनी सती प्रथेविरुद्ध लढा दिला, महर्षी कर्वे आणि ज्योतिबा फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला तर काही समाजसुधारकांनी बालविवाहाला विरोध केला.

शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात ही मुलगी नको ही मानसिकता असलेली कुटुंबे मोठया प्रमाणात असून, या कुटुंबामध्ये स्त्रीच्या मताला काडीचीही किंमत नाही हे स्त्रीभ्रूणहत्येच्या वाढल्या प्रमाणावरून दिसून येते. या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी याबाबत अनेक उपक्रम राबविले. विज्ञान शाप की वरदान, असा प्रश्न नेहमीच उपस्थित राहतो, परंतू ज्या विज्ञानाने मानवजातीवर उपकार करणारे असंख्य शोध लावेल त्या शोधाचा गैरफायदा मानवाने मानवासाठी देखील केला जसे विज्ञानाचा उपयोग करून माणसाने अणुबॉम्ब बनविला आणि लाखो लोकांचा जीव घेतला. 'सोनोग्राफी' मशिन हा असाच एक विज्ञानविष्कार आहे. या तंत्रज्ञानामुळे आईच्या गर्भातील बाळाच्या आजारांसह अनेक गोष्टी समजू शकतात, तसेच बाळाचे लिंगही सहजपणे समजते. नेमक्या याच गोष्टीचा गैरफायदा आधुनिक डॉक्टर घेतात आणि पैशाच्या लालसेपोटी हजारो स्त्रीगर्भाचे बळी घेतात आणि अजूनही घेत आहेत. महाराष्ट्रात २०१८ सालच्या गणनेनुसार १००० मुलांमागे ९१६ इतकी मुलींची संख्या झाली आहे. वास्तविक लोकसंख्येतील स्त्रियांचे घटणारे प्रमाण ही परिस्थिती आजची नाही. १९८४-८५ मध्ये ७८,००० स्त्रीगर्भ हे गर्भलिंगनिदान करून नष्ट केले. त्यानंतर मुंबईत 'प्रसवपूर्व गर्भजल परीक्षणाव्दारे लिंगनिवड प्रतिबंध कायदा' अस्तित्वात आला. प्रतिबंधात्मक नियम तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. १९८८ साली महाराष्ट्रात गर्भलिंग-चिकित्सविरोधात नियम केला.

मोठया शहरांमध्येही वंशाला दिवा हवा, मुलगाच हवा या पारंपारिक समजुतीचा पगडा असलेले लोक आहेत. त्यात गरीब–श्रीमंत, शिक्षित–अशिक्षित लोकांचा समावेश आहे तसेच आपली संपत्ती आपल्याच घरात राहावी असे, स्वार्थी विचार करणारे लोक देखील आहेत आणि त्यांच्या मदतीला सोनोग्राफी सेंटर्सही भरपूर आहेत. त्यातील काही ठिकाणी गर्भपाताचे प्रकार घडून येतात व त्याचा खर्चही जास्त असतो. हा खर्च ग्रामीण भागातील जनतेला परवडणारा नाही.

सोनोग्राफीसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करुन गर्भाचे लिंग तपासायचे आणि मुलगी असल्यास गर्भपात करायचा. या कृत्यामुळे पंजाब, हरियाणा, राजस्थान, महाराष्ट्र इ. राज्यातील मुलींचे प्रमाण वेगाने घसरू लागले आहे. उठता–बसता शाहू, फुले व आंबेडकर यांची नावे घेणाऱ्या राजकाण्यांनीही या विरोधात कधीच आवाज उठवला नाही किंवा कोणतीही उपाययोजना देखील केल्या नाहीत. पक्षाने, उच्च लोकांनी, सामान्य–गरीब लोकांनी, समाजसेवी संस्थांनी, वैदयकीय क्षेत्रातील मंडळींना, प्रशासकीय क्षेत्रातील कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी एकजुटीने, एक विचाराने कार्यरत झाले पाहिजे. स्वतःबरोबरच इतरांची मानसिकता बदलली पाहिजे आणि पैशासाठी कळी उमलण्याआधी मारणाऱ्या या डॉक्टरांना कठीण शिक्षा झाली पाहिजे. असे जर झाले तर नक्कीच पुढच्या जनगणनेत मुलींचा जन्मदर वाढेल आणि स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण कमी होतील.

**सृष्टी त्रिंबककर**
तृतीय वर्ष
मराठी विभाग



# स्वच्छ भारत !
# श्रेष्ठ भारत !




माझा भारत देश जगातील सर्वांत मोठे लोकशाही राज्य आहे. भारताचा इतिहास मोठा रोमांचक व स्फूर्तिदायक आहे. प्राचीन भारतीय संस्कृती ही भारतीयांची सर्वात मोठी ठेव आहे. भारतात बोलल्या जाणाऱ्या विविध भाषा भारताचे वैशिष्ट्य आहे. माझ्या भारतभूमीने अनेक नररत्नांना जन्म दिला आहे. गौतम बुद्ध, सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, महात्मा फुले, महात्मा गांधीजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, रवींद्रनाथ टागोर, सरोजिनी नायडू, स्वामी विवेकानंद, संत गाडगेबाबा ह्या सर्व महान विभूतींनी गौरवास्पद ठरलेला माझा भारत महानच आहे.

भारताचा भूगोल हा वैविध्यपूर्ण आहे. मोसमी वाऱ्यांचे वरदान, हिमालयाच्या मायेची पाखर आणि गंगा, यमुना,कृष्णा, गोदावरी अनेक नदयांची मायाममता यावर माझी मातृभूमी पोसलेली आहे. भारतावर निसर्गाचा तर वरदहस्तच आहे. याच निसर्गाचे व माणसाचे एक सुंदर नाते आहे. निसर्ग व मानव हे एकमेकांना पूरक होते. माणूस एक बी पेरतो आणि त्यातून शंभर कोटी धान्य निर्माण होते. माणसे झाडे-पाने-फुले वाढवतात आणि मग हिच झाडे माणसाला रसाळ फळे देतात. नदीला मानव माता मानतो आणि नदी माणसाची तहान भागवते असे हे परस्पर सामंजस्य होते. परंतु औदयोगिक क्रांतीमुळे माणसाने सारा समतोल बिघडविला. चक्राच्या शोधानंतर एका पाठोपाठ वाहने आली, माणसाची गती वाढली, पण हवा प्रदूषित झाली. आकाशातील दूषित हवेचे ढग पावसाळी ढगांवरही मात करतात. गिरण्या, कारखान्यांची निर्मिती झाली आणि मग त्यांचे दूषित पाणी नद्यांत सोडण्यात आले. नद्यांचे पाणी दूषित झाले. ह्या साऱ्याला कारणीभूत ठरली ती आपली वाढती लोकसंख्या.

भारताची लोकसंख्या आता अब्जाच्या पलिकडे गेली आहे. त्यामुळे जंगलतोड, पाऊस कमी, जमिनीची धूप सतत चालू आहे. पोटाच्या मागे लागलेला समाज शहराकडे धावू लागला. त्यामुळे शहरातील झोपडपट्टी वाढली. आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणजे 'धारावी' झोपडपट्टी. हया सगळ्यामुळे प्रचंड प्रमाणात अस्वच्छता निर्माण झाली आहे. मुंगीपासून गरूडापर्यंत सर्वजण धरतीची प्रकृती सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करतात; पण माणूस मात्र आपल्या बुद्धिमत्तेने आणि कार्यशक्तीने पर्यावरणाचा तोल बिघडवून टाकतो आहे. वैज्ञानिक प्रगती, औदयोगिक प्रगती करताना त्यातून निर्माण होणारे विनाशक घटक कसा व कोणता -हास करीत आहेत हे सोयीस्कररित्या विसरले जाते. स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, स्वच्छ अन्न यांची प्रत्येक प्राणीमात्राला गरज आहे. पण याच गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करतो. आयुर्वेदात सांगितलेल्या व वर्षानुवर्षे वापरत असलेल्या अमूल्य वनस्पतीही नष्ट झाल्या आहेत.

''भौतिक प्रगतीचा आम्हा ध्यास
अस्वच्छता करतो पर्यावरणाचा -हास
गुदमरतोय चराचर सृष्टीचा श्वास
मात्र आम्हाला लागत नाही स्वच्छतेची आस''

माणसांची संख्या अविरत वाढत आहे. त्याचबरोबर मानवनिर्मित कचरा वाढत आहे. त्यात नष्ट न होणाऱ्या प्लास्टिकचा कचरा हिमालयापासून हिंदी महासागरापर्यंत पसरला आहे. मानवच विशुद्ध पर्यावरणाचा शत्रू ठरला आहे. आपले घर आणि आपला परिसर किती परस्परसंबंध आहे, हे माहित असूनही आपण घर स्वच्छ ठेवतो मात्र आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवित नाही. आपला परिसर विशुद्ध रहावा म्हणून कधी कडुलिंब, तुळस, दुर्वा यांची आवर्जून लागवड करीत नाही. पूर्वी संयुक्त कुटुंबात या गोष्टी वडीलमाणसांकडून लहानांपर्यंत केल्या जात असतं. आता मात्रा चौकोनी कुटुंबात यांना थाराच नाही. स्वाभाविकच ही जबाबदारी आपली आहे. घर स्वच्छ ठेवता तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला पाहिजे. तरच आपला समाज स्वच्छ होईल. जेव्हा आपण घर → कुटुंब → समाज → राष्ट्र → देश या साखळीचा विचार करू तेव्हाच माझा देश स्वच्छ देश श्रेष्ठ देश बनेल.

भारत आणि पाश्चात्य देशामधील एक सगळ्यात मोठा फरक म्हणजे स्वच्छता. ती शहरे इतकी स्वच्छ आणि सुव्यवस्थित कशी ? असा प्रश्न आपल्याला नेहमीच पडतो. आज आपल्या देशातील सार्वजनिक ठिकाणांचा विचार केला तर बसमध्ये, रेल्वे स्थानकांवर, कार्यालय, उद्याने, रस्त्यांवरील गल्ली-बोळ्यात सर्वत्र  अस्वच्छता आढळून येते. पर्यटनस्थळी गेलो तरी कुठे ही थुंकणे, पान खावून पिचकारणे, सिगारेटची थोटके, खाद्य पदार्थांची वेष्टने, कागदाचे तुकडे, प्लस्टिकच्या पिशव्या, बाटल्या सर्वत्र दिसून येतात. आपल्या नद्या ह्या नद्या न राहता सांडपाणी वाहणारे गटार बनले आहे.

स्वच्छ भारताचे प्रणेते महात्मा गांधीजी आणि उपासक लाल बहादूर शास्त्री यांच्या मूल्यांचा विचार करता. माननीय पंतप्रधान श्री मोदीजी यांनी ऑक्टो २०१४ रोजी ज्या मोहिमेची सुरुवात केली. त्यासाठी एक दिवस नाही तर ३६५ दिवस भारताला स्वच्छ आणि श्रेष्ठ बनविण्याच्या हेतूने निरंतर प्रयत्नशील राहिले पाहिजे. या दोन महापुरुषांचे विचार हे केवळ एका दिवसापुरते मर्यादित न रहाता ते रोज अंमलात आणले गेले तरच माझा भारत देश स्वच्छ भारत बनेल.



संत गाडगेबाबा यांनी स्वतः हातामध्ये झाडू घेवून ग्राम स्वच्छतेची मोहिम राबवली आहे. परंतु गोष्टीचा आपल्याला विसर पडला आहे. आपण स्वार्थी माणसे चांगल्या गोष्टी लगेचच विसरतो. आपण सर्व जबाबदारी सरकारवर टाकून मोकळे होतो. मला असे प्रामाणिकपणे वाटते की, ही केवळ सरकारचीच जबाबदारी नसून आपण आपले कर्तव्य समजून आपणहून पुढे यावे. आज लोकशाहीत आपल्याला पूर्णपणे स्वातंत्र्य मिळालेले आहे परंतु स्वातंत्र्य व त्या जबाबदारी सोबतच आपणांस आपल्या कर्तव्याचा विसर पडलेला आहे. लोक असे ही म्हणतात की, माझ्या एकटयाने काय होणार, मला असे वाटते आपल्यापासूनच सुरूवात व्हायला हवी. किती जण आपल्या मुलांना स्वच्छतेचे महत्त्व सांगतात ? त्याचे अनुकरण करतात. तर याचे उत्तर नाही असेच येईल. आज आपण तरुण पिढी देशाचे भवितव्य घडविणार आहोत. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वामध्येच स्वच्छतेविषयी जागृकता निर्माण झाली पाहिजे.

आजकाल पर्यावरण जपण्याची जाणीव निर्माण झाली आहे असे मला वाटते. त्यासाठी कायदे, नियम केले गेले आहे पण ते आचरणात येत नाहीत. वाहनासाठी आवश्यक पी.यू.सी चाचणी, कारखान्यातील दूषित पाण्याबदलची जबाबदारी, ओला कचरा-सुका कचरा यांची विभागणी या लहानसहान गोष्टी करून आपणाला विशुद्ध पर्यावरण टिकविणे आवश्यक आहे. तशी निष्ठा लोकमानसात रुजवली पाहिजे. प्रत्येक गोष्टींचा उपयोग करून नैसर्गिक गोष्टींचे जतन केले पाहिजे. संत तुकाराम म्हणतात, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी ।' तर इंदिरा संत म्हणतात, 'जरी वेढिले चार भिंतीनी, या वृक्षांची मजला संगत'. सामान्य माणूसही नेहमीच्या त्रासापासून, विचारांपासून दूर जाण्यासाठी हवापालट करण्यासाठी शेवट थंड हवेच्या ठिकाणी निसर्गाच्या सान्निध्यातच जातो. असा हा निर्सगही आपण जपला पाहिजे.

सुजाण नागरिक या नात्याने अपणही आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ, सुंदर बनविण्यासाठी ह्या स्वच्छ अभियान मोहिमेचा श्रीगणेशा करू या. हवी आहे फक्त इच्छाशक्ती, जिद्दीने परिणामकारक प्रयत्न आणि योग्य सरकारी धोरण यांच्या बळावर आपणही आपल्या पूर्वजांप्रमाणे आदर्श व सुव्यवस्थित शहरे निर्माण करू शकतो व इतिहासात आपलेही नाव सामील करू शकतो.



**आरती अडांगळे**
प्रथम वर्ष
मराठी विभाग

# खरा मित्र



ज्याला आपण मनातले बोल न बोलता
कळतात
त्याच्याशीच मनात खोल नाते बनते....
तो खरा मित्र

जो आपल्याला आपण कोण आहोत व
काय आहोत
याची जाणीव करून देतो... तो खरा मित्र
जो आपल्या सुखात आणि दुःखात
नेहमी सोबत असतो... तो खरा मित्र

जो कोणत्याही शब्दविना आपल्या
भावना ओळखतो... तो खरा मित्र
जो आपल्या हजार चुका
माफ करतो... तो खरा मित्र

जो आपल्यामुळे किती दुखावला गेला
तरी आपल्यावर जीव लावतो...
तो खरा मित्र
असे खूप मित्र असतात पण
जो आपल्याला शेवटपर्यंत
साथ देतो... तो खरा मित्र

**ईश्वरी भोगल**
द्वितीय वर्ष
मराठी विभाग

# सर्वांत मोठा हुंडा



नवरा मुलगा लग्न करून त्याच्या घरी पोहोचला, तेव्हा सर्वात प्रथम सर्वांनी विचारले की, तूला हुंडयात काय मिळाले ? नवरा मुलगा काही काळ गप्प बसला.

मग नकळतपणे त्याला नववधूच्या रडण्याचा आवाज ऐकू आला.

तेव्हा मात्र त्याला राहवले नाही.

घरात प्रवेश करताच क्षणी माझ्या पत्नीच्या डोळ्यात अश्रू आले आता मात्र मला बोलावेच लागेल.

आज गप्प बसलो तर आयुष्यभर माझ्या पत्नीच्या डोळ्यात अश्रू पाहावे लागतील मला.

मग नवरा मुलगा म्हणाला, आज मी जगातील सर्वांत श्रीमंत माणूस झालो आहे........

एका पित्याने मला त्याच्या जीवापेक्षा प्रिय असलेली मुलगी दिली आहे.

एका भावाने आपले प्रेम दिले, बहिणीने आपली सावली दिली आणि एक आई जी जगाला सर्व काही देऊ शकते, पण आपली मुलबाळं देऊ शकत नाही त्या आईने आपल्या कुशीत खेळवलेल्या मुलीला दिले आहे. आणखी काय हवे आहे मला !!!


**कुमुद देसाई**
द्वितीय वर्ष
समाजशास्त्र विभाग

# मी माझी सांगाती



युगांची बंधने सारी तशीही पाळते आहे
नव्याने कुंपणे काही, स्वतःला घालते आहे

प्रसंगी भांडते थोडी कधी माघार घेते आहे
हवे ते घेऊनी बाकी नको ते टाळते आहे

नको त्या वाटेवरी पेरून पुन्हा कांटे सारे तू
ठणकती पावले माझी जपूनी टाकते आहे

कुणाशी वैर ना माझे कुणाशी वाद ना माझा
कधी वैतागले जरी का मी स्वतःशीच भांडते आहे

तुझ्या छायेत आले नी स्वतःलाच पारखते आहे,
हरवली नेमकी कोठे मी स्वतःला स्वतःमध्ये शोधत आहे.

**समृद्धी काकडे**
अकरावी आर्टस

# रात्र मला काय देते?



रात्र मला काय देते
नकळतपणे जगण्याची आस देते ?
नवीन प्रवासाची एक पहाट देते
रात्र मला काय देते ?
मनसोक्त रडण्यास वेळे देते
स्वावलंबी असण्याची सकाळ देते
हास्य राखण्याची हिम्मत देते
रात्र मला काय देते ?
काल्पनिक जग फुलविण्यास वाव देते
स्वप्न पाहण्याची इच्छा प्रफुल्लित करते
रात्र मला काय देते ?
आपल्याला आपल्याशी बोलण्यास सवड देते
स्वविचारांचा मार्ग मोकळा करते
रात्र मला काय देते ?
आपल्या मनातील खास व्यक्तीस भेटण्याचा क्षण देते
सुखदुःखांच्या हिंदोळ्यावर मन हलके करते
रात्र मला काय देते ?


**रितुजा यादव**
द्वितीय वर्ष
मराठी विभाग

# प्रवास बाईपणाचा..!



बाईपणाच्या गोष्टी वाचताना बाईवर झालेला अन्याय कळताच तिचा आतल्या आत विस्फोट होतोय आज..

तिच्या कोवळ्या मेंदूला झिणझिण्या येताहेत..
उद्रेक होऊ पाहतोय आतल्या विचारांचा रोजरोज.. तिची अवस्था फार नाजूक होत आहे..

तिला समजवावं लागत आहे मला
त्या काळातलं, ते ते परिमाण..
बाईच्या आतून बाहेर सरकणार
आदिमतेपासून ते अनादी अनंत काळापर्यंतच परिवर्तन..

तिला द्यावी लागते आहे एक तिची तिची स्पेस
तिच्या जनरेशनची ओळखून कुवत..
तिच्या गळी उतरवण इतक्या सहज शक्य होत नाहीत घटना, व्यथा, वेदना, सल
आणि समस्येवरचे उपायही.
होत आहे प्रचंड दमछाक

त्या त्या काळाची शमलेल्या
आणि दमलेल्या वेदनेचा इतिहास तिच्यापर्यंत पोहोचवताना..

कित्येक दशकांची बाईची गोष्ट
तिला समजवावी लागेल आधी...
त्याची तयारी करण्यातच कदाचित
माझं उरलेलं आयुष्य सरूनही जाईल.

तरीही आजच्या "ती" ला काही प्रश्नांची उत्तरं देऊच शकणार नाही मी

तिचा प्रश्न माझ्या प्राणांवर बेतल्यासारखा
अन् उत्तरं भूमिगत झाल्याचा साक्षात्कार होत राहील अगदी शेवटपर्यंत मला..

इतकं सांगू शकते मी ठाम की, बाई गं आता आम्ही प्रवेशलो आमचं आयुष्य.
तुम्हीही दिर्घकाळ प्रसवासाठी तयार रहा

फक्त तो तुमचा प्रसव आणि प्रवास प्रवेशताना डोळस असू द्या.

**आनंदिता**
**प्रा. निर्मला शेवाळे**
(पालक)

# गर्जा महाराष्ट्र माझा




होऊनी हर्षित गातो आम्ही थोरवी महाराष्ट्राची
नमन तुजला करीतो आम्ही तू पवित्र भूमी संतांची ।।

१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन. याच दिवशी १९६० साली तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. पंडितांनी यशवंतराव चव्हाण यांच्या हाती महाराष्ट्राचा मंगलकलश दिला आणि नव्या महाराष्ट्राची जबाबदारी सोपवली. तसा महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. राजकीय सभेच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही देशाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासातही मोलाचे योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा धार्मिक सुधारणांचा, सामाजिक, सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी आहे. राज्याचे विविधांगी भावविश्व थक्क करणारे आहे. महात्मा गांधीजींनी महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ अशा शब्दांत महाराष्ट्राची प्रशंसा केली. महाराष्ट्र ही संत महंत, ऋषि-मुनींची जशी भूमी आहे तशीच शूरवीरांची ही आहे. या भूमीला पराक्रमाची, त्यागाची देश-प्रेमाची परंपरा लाभली आहे म्हणूनच असे म्हणेन,

पाहिलेस न तू परकीय स्वकीय
झेलल्या किती यातना
उद्धरिण्या तुज, शिवबा आला
जागविली नवचेतना !

हा तोच महाराष्ट्र आहे ज्या महाराष्ट्राने मुघलांचे राज्य स्वीकारले नाही आणि त्या काळात स्वराज्याचे स्वप्न आपल्या डोळ्यासमोर ठेवले. आणि फक्त डोळ्यांसमोरच ठेवले नाही तर आपले प्राण पणाला लावून रयतेसाठी स्वराज्याची स्थापना सुद्धा केली आणि सर्वदूर सुराज्य निर्माण केले. माझ्या राजांबरोबर असणाऱ्या मावळ्यांच्या या स्वराज्यात आणि महाराष्ट्राच्या निर्माणात खारीचा वाटा आहे हे या कुणी विसरता कामा नये.

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत मुक्ताबाई, समर्थ रामदास अशा अनेक संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्र मनाचे संवर्धन पोषण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. 'हात्मा फुले, सावित्री फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांनी समाज प्रबोधनासाठी अपार कष्ट घेतले. देशाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पाहताना द्विभाषिक राज्याचे एक शक्तिशाली राज्य व्हावे, यासाठी लोकनेते बुद्धीवादी, लेखक, पत्रकार यांनी मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणण्याची कल्पना सत्यात उतरवली. एस. एम. जोशी, आचार्य अत्रे, सेनापती बापट, अमृत डांगे, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेकजण नवमहाराष्ट्राच्या मोहिमेसाठी एक झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले. महाराष्ट्राच्या मातीचे, साजशृंगाराचे गुणवर्णन अनेक प्रतिभावंतांनी, इतिहासकारांनी करून ठेवले आहे आणि ते म्हणजे,

मूळभाषा मराठीतच
नांदते सर्वाघरी
कपडे नवे ती धारण करिते
बदलून वरचेवरी !

आतापर्यंत महाराष्ट्राने साहित्य, कला, शिक्षण, क्रिडा, संस्कृती, नाट्य, चित्रपट, संगीत, कृषी, उदयोग, संगणक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवत वैभवशाली इतिहास जपत प्रगतीची नवनवीन शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धार आपण करावयास हवा. कारण आपल्या महाराष्ट्राचे लालित्य हे अतिशय अद्बितीय, लाघवी, उदात्त असे आहे महान असे असणारे आपले राष्ट्र म्हणजे जणू आपली जननीच.

अहो, आपला महाराष्ट्र कसा घडला ? जेव्हा जेव्हा हिमालयाने हाक मारली तेव्हा तेव्हा सह्याद्री धावून आला. उज्ज्वल भवितव्याची आस धरीत, सहयाद्री पर्वतांच्या रांगांमधून नदयांच्या वाहणा-या खळखळत्या पाण्यामधून, वेरुळच्या शिल्पांमधून तो पोलादी झाला. विठ्ठलाच्या ओढीनं हजारो मैलांचा प्रवास करीत वारकऱ्यांच्या वारीमध्ये भजनात तन-मन विसरुन डोलू लागला. हिंदवी स्वराज्य स्थापन केलेल्या शिवबाच्या लखलखत्या तलवारीप्रमाणे निधड्या छातीचा झाला संतांच्या अभंगांमधून, काव्यांतून, भारुडांमधून कनवाळू मायाळू बनला. लता दीदींच्या स्वरांतून शेतक-यांच्या घामातून डोलणा-या पिकांतून महाराष्ट्र मेहनती झाला. गोरगरिबांच्या चटणी भाकरीतून, बलिदान करणाऱ्या सैनिकांच्या रक्तांमधून त्याने उभारी घेऊन आज हाच महाराष्ट्र प्रत्येकांच्या मनावर राज्य करतोय आणि त्याचा जन्मदिवस १ मे हा आपण आपल्याच वाढदिवसाप्रमाणे करतो. शाळा महाविद्यालये एकत्र येऊन भाषणे, गौरव गीते, आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे कार्यक्रम अगदी उत्साहात करतात. ढोल, ताशे, नगारे, झांज, लेझीम ही सगळी वादये जल्लोषाने वाजवली जातात. भगवा झंडा आकाशात ताठ मानेने उभा राहून महाराष्ट्राचे रक्षण करतो.

अशा सगळ्या अद्भूत एकसंघ बाबींनी आपण महाराष्ट्र दिन साजरा करतो. हा महाराष्ट्र असाच कायम मजबूत राहण्यासाठी आपल्या सर्वांची मनगटे संकटांशी दोन हात करणारी हवीत, एकजूटीने राहणारी हवीत तरच या महाराष्ट्राचे खरे पावित्र्य हे जपले जाईल.

**माधवी पवार**
तृतीय वर्ष
मराठी विभाग



# मराठी विभाग उपक्रम

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२-२३









**स्वावलंबनाचा प्रवास हा प्रत्येक विद्यार्थिनींचा घडलाच पाहिजे!-प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना पत्की**

वसई,(प्रतिनिधी) : 'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या'चे तिसरे पुष्प हे 'प्रवास मराठीचा : प्रवास माणसाचा' ह्या व्याख्यानासाठी वाहिले गेले. प्रवास मराठीचा सांगता सांगता माणसं ही कशी घडत जातात आणि त्यात ही विशेषत: मुलींनी स्वत: सक्षम होणे किती महत्त्वाचे आहे. वेल ही झाडाच्या आधाराने वाढत जाते व कालांतराने झाडाच्या रूपात बहरते. तसेच प्रत्येक विद्यार्थिनी झाडाप्रमाणे विशाल होऊन दुसऱ्यांना आधार द्यावा इतके सक्षम होणे गरजेचे आहे. ह्या सक्षमीकरणाच्या प्रवासात स्वावलंबनाचा प्रवास हा प्रत्येक विद्यार्थिनींचा घडलाच पाहिजे. विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास हाच महाविद्यालयाचा ध्यास आहे." असे उद्गार सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी काढले. 'प्रवास मराठीचा : प्रवास माणसाचा' ह्या व्याख्यानाचे प्रमुख मार्गदर्शक सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. जगदीश संसारे होते. त्यांनी सुरुवातीला मराठी भाषेचा प्रवास मांडून प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात चांगले-वाईट अनुभव घेत घेत आपल्या आयुष्याचा पल्ला गाठत जातो आणि हा पल्ला गाठण्यासाठी त्याला एक व्यक्ती म्हणून कुटुंब, मित्रमैत्रिणी, समाज आणि राष्ट्र यांचे सहाय्य कसे मिळत जाते. ह्या प्रवासात स्थळालाही तितकेच महत्त्व आहे. मराठीतील प्रवासवर्णनांनी आपल्याला काय शिकविले व्यक्तीच्या प्रवासासोबतच त्या त्या स्थळांचा ही प्रवास तितकाच महत्त्वाचा असतो हे सांगताना 'माझा प्रवास' ह्या गोडसेंच्या प्रवासवर्णनापासून ते 'अपूर्वाई', 'चाला समुद्रापलिकडे' सारख्या प्रवासवर्णनांची काही उदाहरणे मांडून दाखविली. हे व्याख्यान अगदी खेळीमेळीच्या वातावरणात प्रा. जगदीश संसारे यांनी घेतले. विद्यार्थिनींकडून लहान लहान उपक्रम घेऊन त्यांनी व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रवास कसा गाठावा, हे मांडून दाखविले. सदर कार्यक्रम हा महाविद्यालयाच्या मराठी विभागाने आयोजित केला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. माधवी पवार तर आभारप्रदर्शन वैष्णवी बोवडे या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. हिरालाल भोसले आवर्जून उपस्थित होते. १०० हून अधिक विद्यार्थिनींनी व्याख्यानाचा लाभ घेतला.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२-२३ सलग १५ दिवस दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२३ भाषेचे संवर्धन करण्यासाठी कार्यशाळा, विविध उपक्रम राबविण्यात आले.**

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२-२३




**मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं**
**पुरी बांणली बंधुता अंतरंगीं, हिच्या एक ताटांत आम्ही बसूं**
**हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरीं**
**जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं**

# मराठी भाषा गौरव दिन






**रोजच्या जगण्यात मायमराठीचा अट्टाहास असेल तरच खरा मराठी भाषा गौरव दिन ठरेल - कलाकार प्रदीप कदम**

**मुंबई. प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिन हा केवळ एक दिवसाचा नसावा रोजच्या जगण्यात मायमराठीचा आट्टाहास असेल तरच खरा मराठी भाषा गौरव दिन ठरेल. मराठी माणूस, मराठी भाषा, मराठी साहित्य आणि मराठी कलाकार हे सारेच समृद्ध आहे, असे उदगार कलाकार श्री. प्रदीप कदम ह्यांनी सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त

झमराठी भाषा गौरव दिन २०२३फह्या विशेष कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून काढले. आपल्या भाषेची श्रीमंती आपणच वाढविली पाहिजे त्यासाठी अगदी लहान लहान गोष्टींपासून सुरूवात करा. व्यवहार भाषेत मराठीचाच वापर करा. तरूण पिढीकडे सोशल मिडियासारखे शस्त्र हाती आहे त्यातही अधिकाधिक मराठीच वापरा. महाविद्यालय हे एक उत्तम साधन आहे जेथे शिक्षणासोबत कलेलाही वाव मिळतं असतो. अनेक विद्यार्थिनींनी श्री. प्रदीप कदम यांना त्यांच्या अभिनय क्षेत्राशी निगडीत प्रश्न विचारले. शेवटी विद्यार्थिनींनासोबत घेऊन एक छोटासा

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य एक तो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढा जगात माय मानतो मराठी

आमुच्या मनामानात दगं ते मराठी
आमुच्या रगरगात रंगते मराठी
आमुच्या उरा उरात स्पंदते मराठी
आमुच्या नसानसात नाचते मराठी

आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यात रांगते मराठी
आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरात वाढते मराठी


**२७ फेब्रुवारी २०२३ मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.**

# विश्व मराठी साहित्य संमेलनात सहभागी






## कादंबरी लेखन मास




## सदा बहार वसंतोत्सव



माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जगल्या दऱ्याखोऱ्यातील शिळा ||

# मराठी विभागातील विद्यार्थिनींचा गौरवांकित प्रवास








**सुवर्ण पदक विजेती कु.वैष्णवी तांबिटकर**

# मराठी विभागातील विद्यार्थिनींचा गौरवांकित प्रवास







# मराठी विभागातील माजी विद्यार्थिनींचा गौरवांकित प्रवास










कु.तेजल गुरव जी-२० या शासकीय उपक्रमात सहभागी

# मराठी विभागातील विद्यार्थिनींचा गौरवांकित प्रवास











## राज्यस्तरीय स्पर्धेत माधवी पवार ठरली अव्वल

**वसई दि.१९ (प्रतिनिधी):** मंगळवार, दिनांक १६ मे २०२३ रोजी सरहद कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, कात्रज, पुणे आयोजित 'कला - आविष्कार आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय स्पर्धा- २०२३' ही अतिशय उत्साहात पार पडली. वक्तृत्व, पोवाडा-भारुड सादरीकरण व स्वरचित कवितावाचन अशा तीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ.तुकाराम रोंगटे आणि कवी गोपाळ कांबळे आणि यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सदर स्पर्धेत दहा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. अफझलखानाच्या वधाचा पोवाडा सादर करून एम एम पी शाह स्वायत्त महिला महाविद्यालय माटुंगा येथील माधवी पवार अव्वल ठरली.

# मराठी विभागातील विद्यार्थिनींचा गौरवांकित प्रवास



Seva Mandal Education Society's
Smt. Maniben M. P. Shah Women's College of Arts and Commerce
Smt. K.G. Shah Department of Mass Media
Smt. Parameshwari Devi Gordhandas Garodia Educational Complex,
338, R. A. Kidwai Road, Matunga - 400019.

RAZZMATAZZ
Bollycom
2022 - 2023

This is to certify that Mr. / Ms. Madhuri Pawar
Has Secured 2nd Place in the event Singing held on 3rd/4th Jan'23

Ms. Shagufta Memon, Co-ordinator
Mrs. Archana Patki, Officiating Principal



राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन–२०२३
STATE REPUBLIC DAY PARADE-2023
प्रमाणपत्र / Certificate

Waghe Karina Kisan
SNDT Women's University, Mumbai

[illegible]

has attended the State Republic Day Parade Camp organized by NSS Cell, Department of Higher & Technical Education, Government of Maharashtra and University of Mumbai from 17th to 26th January, 2023 at Vidyanagari, Santacruz (E), Mumbai & participated in Republic Day Parade at Shivaji Park, Mumbai on 26th January, 2023.

MR. SUSHIL R. SHINDE, OSD NSS, UNIVERSITY OF MUMBAI
PROF. (DR.) RAMESHWAR R. KOTHAWALE, SLO & OSD NSS CELL, GOVT. OF MAHARASHTRA
PROF. (DR.) D. T. SHIRKE, AG. VICE-CHANCELLOR, UNIVERSITY OF MUMBAI

Sr. No. 71/90/2023



SEVA MANDAL EDUCATION SOCIETY'S
Shri. M.P. Shah Junior College of Arts & Commerce for Women
Smt. Maniben M. P. Shah Women's College of Arts & Commerce

Certificate of Achievement

Ms. RITUJA YADAV
for Securing 1st Place Place in the TUG OF WAR
at AMULAKH AMIRCHAND SCHOOL GROUND
Date : 20/12/2022

Sports Incharge
Principal



देवगड महाविद्यालय सांस्कृतिक विभाग आयोजित
"गोष्टरंग कथा कथन स्पर्धा २०२२"
सन्मानपत्र

Madhavi VijayKumar pawar

आंतरराज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी कथा कथन स्पर्धा २०२२ मध्ये प्राथमिक फेरीतील यशस्वी सहभागाबद्दल हे करण्यात येत आहे

सांस्कृतिक समन्वयक
परीक्षक
परीक्षक



## रोज मराठीचा अट्टहास हवा : प्रदीप कदम

मुंबई, ता. २८ (बातमीदार) : 'मराठी भाषा गौरव दिन' हा केवळ एक दिवसाचा नसावा रोजच्या जगण्यात मायमराठीचा आट्टहास असेल तरच खरा मराठी भाषा गौरव दिन ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ कलाकार प्रदीप कदम यांनी केले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'मराठी भाषा गौरव दिन' या विशेष कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

अनेक विद्यार्थिनींनी प्रदीप कदम यांना त्यांच्या अभिनय क्षेत्राशी निगडीत प्रश्न विचारले. शेवटी विद्यार्थिनींना सोबत घेऊन एक छोटासा मराठी मालिकेतील भागही सादर करण्यात आला.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी विद्यार्थिनींच्या सहभागावर आधारित मराठी भाषेचे संमेलन, कार्यशाळा, चर्चासत्रे यासारखे कार्यक्रम सातत्याने करून सदैव मराठीचा जागर करत राहणे ही आता काळाची गरज आहे, असे म्हणून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.



## कला आविष्कार स्पर्धेत माधवी पवार अव्वल

मुंबई : पुणे येथील सरहद कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्सतर्फे आयोजित 'कला-आविष्कार' या आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय स्पर्धेत अफजल खानाच्या वधाचा पोवाडा सादर करणाऱ्या माटुंगा येथील एमएमपी शहा स्वायत्त महिला महाविद्यालयाच्या माधवी पवार अव्वल ठरल्या आहेत. वक्तृत्व, पोवाडा-भारुड सादरीकरण व स्वरचित कवितावाचन अशा तीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. तुकाराम रोंगटे

मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य

# धन्यवाद

SEVA MANDAL EDUCATION SOCIETY'S
SMT. MANIBEN M.P. SHAH WOMEN'S COLLEGE OF ARTS & COMMERCE (AUTONOMOUS)
NAAC RE-ACCREDITED 'B++' GRADE WITH CGPA 2.88/4
UGC Honor : College with Potential for Excellence

मराठी विभाग, श्रीमती. परमेश्वरी देवी गोरधनदास गरोडिया शैक्षणिक संकुल,
३३८, आर ए किडवाई रोड, माटुंगा (पू), मुंबई ४०००१९

द्वारे प्रकाशित, सर्व कॉपीराइटसह @२०२३